THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 15TH FEBRUARY 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### कित्येक निरुपयोगी कायदे रद्द करण्याबाबदचा व दुसरे कित्येक कायदे सुधारण्याबाबदचा मसुदा.

ज्याअर्थी, ह्या आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांचा अमल होऊन गेल्या कारणानें, किंवा ते स्पष्टपणें व नामनिर्देश करून रद्द करण्यांत न येतां इतर रीतीनें अमलांतून गेलेले असल्याकारणानें, किंवा कालांतरानें किंवा इतर कांहीं कारणानें त्यांची जरुरी राहिली नसल्याकारणानें, ते स्पष्टपणें व नामनिर्देश करून रद्द करणें इष्ट आहे,

आणि तसेंच ज्याअर्थी ह्या आक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांत कांहीं किरकोळ सुधारणा करणें इष्ट आहे;

त्याअर्थी ह्यावरून पुढीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) ह्या कायद्यास सन १८९४ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें. — सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या अमलाखालील सगळ्या मुलुखांस लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. (१) पहिल्या परिशिष्टांत सांगितलेले कायदे, त्याच्या चवथ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर यावरून रद्द केले आहेत. — परिशिष्टांमध्यें सांगितलेले कायदे अनुक्रमें रद्द व दुरुस्त केले आहेत.

(२) दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या कायद्यांमध्यें, त्याच्या चवथ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर व त्या रीतीनें फेरफार केला आहे.

३. या आक्टावरून कोणताही कायदा रद्द केल्यामुळें, तो कायदा ज्या स्टाटुटांत, आक्टांत किंवा कायद्यांत लागू केला असेल, सामील केला असेल किंवा ज्यांत त्याचा हवाला दिला असेल, त्यास बाध येतो असें समजूं नये; — कायम ठेवणें.

आणि जी कोणतीही गोष्ट अगोदर केली असेल किंवा करूं दिली असेल, तिचा कायदेशीरपणा, बेकायदेशीरपणा, परिणाम किंवा फळ यांस, किंवा अगोदर संपादन

केलेला, उत्पन्न झालेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, सत्ताधिकार, जबाबदारी किंवा पात्रता यांस, किंवा यांच्या संबंधानें केलेला कोणताही उपाय किंवा चालविलेलें काम यांस, किंवा कोणतेंही कर्ज, गुन्हेगारी, जबाबदारी, पात्रता, दावा किंवा मागणी यांपासून मिळालेल्या कोणत्याही सुटकेस किंवा मोकळिकीस, किंवा अगोदर दिलेल्या कोणत्याही हमीस, किंवा मागील कोणत्याही कृत्याच्या किंवा गोष्टीच्या पुराव्यास, या आक्टावरून बाध येतो असें समजूं नये;

तसेंच, कायद्याचें कोणतेंही तत्त्व किंवा नियम, किंवा ठरलेली हुकूमत, प्लीड करण्याची पद्धत किंवा क्रम, वहिवाट किंवा काम चालविण्याची रीति, किंवा चालू रिवाज, चाल, सवलत, यत्ता, माफी, हुद्दा किंवा नेमणूक हीं, या आक्टाअन्वयें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्यावरून, कायद्यांत किंवा कायद्यापासून कोणत्याही रीतीनें यथाक्रम कायम केलीं असलीं, कबूल केलीं असलीं किंवा निष्पन्न झालीं असलीं तरी, त्यांना या आक्टावरून बाध येतो असें समजूं नये;

त्याचप्रमाणें, हल्लीं नसणारी किंवा अमलांत नसणारी कोणतीही हुकूमत, हुद्दा, चाल, पात्रता, हक्क, सत्ताधिकार, सवलत, पत्ता, माफी, रिवाज, वहिवाट, काम चालविण्याची रीति किंवा इतर बाबत किंवा गोष्ट, या आक्टाअन्वयें कोणताही कायदा रद्द झाल्यानें ठरते किंवा पुनः चालू होते असें समजूं नये.

---

## पहिलें परिशिष्ट.

### कायदे रद्द केले ते.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. | शेरा. |
| | | **भाग १.—मुंबई कोडांतील कायदे.** | | |
| १८२७ | २ | जातप्रकरणें; वकील. | [ रद्द करावयाचा मजकूर कायद्याच्या भाषांतरांत नाहीं. ] | [ ४ थें कोष्टक पाहा. ] |
| ” | ९ | [ भाषांतर उपलब्ध नाहीं. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |
| ” | १२ | पोलीस. | [ रद्द करावयाच्या मजकुराचें भाषांतर झालें नाहीं. ] | [ ४ थें कोष्टक पाहा. ] |
| ” | १३ | फौजदारी कोर्टें. | अंक [ पुरवण्या ] १, २, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३ व १४. | हे अंक [ पुरवण्या ] ह्या कायद्याच्या ज्या कलमांस लागू होते तीं कलमें रद्द झालीं असल्याकारणानें, ते निरुपयोगी झाले आहेत *** [ खालीं टीप पाहा ]. ( अंक ३ हा, सन १८६६ चा मुंबईचा आक्ट ६, यावरून रद्द केला आहे. ) |

**टीप.**—जेथें सदरीलप्रमाणें तीन फुल्या केल्या आहेत तेथील मजकुराचें भाषांतर करणें निरर्थक असल्याकारणानें तो गाळला आहे.

पहिलें परिशिष्ट—चालू.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. | शेरा. |
| | | **भाग १.—मुंबई कोडांतील कायदे—समाप्त.** | | |
| १८२७ | २० | जकात. | रद्द झालेला नसेल तेवढा. | कांहीं भाग, सन १८३८ चा १ व सन १८९२ चा १, या आक्टांवरून रद्द झाले आहेत.<br>जे भाग नामनिर्देशानें रद्द केलेले नाहींत ते, सरनामा, कारण, आणि अंक [ पुरवण्या ] ४, ६ व ७ हे होत. * * * बाकीचा सर्व कायदा रद्द झाला असल्याकारणानें, हे भाग निरुपयोगी झाले आहेत हें उघड आहे. * * * |
| ,, | २१ | अफू व पिण्याची दारू यांवर जकात. | रद्द झालेला नसेल तेवढा. | बाबी १ ते ४ सन १८७८ चा आक्ट १ यावरून, बाबी ५ ते ८ सन १८९७ चा आक्ट ४ यावरून, बाब ९ सन १८६६ चा मुंबईचा आक्ट ८ यावरून आणि बाबी १० ते १३ सन १८७८ चा मुंबईचा आक्ट ५ यावरून, रद्द झालेल्या आहेत.<br>सरनाम्याचा कांहीं भाग सन १८७६ च्या १२ व्या आक्टावरून रद्द झालेला आहे, आणि कारणापैकीं कांहीं भाग, सन १८७३ चा १२, सन १८७६ चा १२ व सन १८७८ चा १ या आक्टांवरून रद्द झालेला आहे.<br>जे भाग नामनिर्देश करून रद्द केलेले नाहींत ते, सरनामा व कारण यांतील कांहीं भाग आणि पुरवण्या [ अंक ] हे होत. बाकीचा सर्व कायदा रद्द झाल्या कारणानें, हे भाग निरुपयोगी झाले आहेत हें उघड आहे. *** |
| ,, | २९ | महाराष्ट्र व खानदेश. | कलम २, रकम पहिली, हींतील, ' सन १८२७ चा अठरावा कायदा व स्टांपाचे बाबदींत जे दुसरे हुकूम लिहिले आहेत त्यांशिवाय, ' हे शब्द व अंक. | हे शब्द व अंक, सन १८२८ चा मुंबईचा कायदा ४, यावरून रद्द झाल्यासारखेच आहेत.<br>सन १८२७ चा मुंबईचा १८ वा कायदा स्टांपांबाबदचा असून तो, सन १८६० च्या ३६ व्या आक्टावरून रद्द केलेला आहे, आणि दक्षिणेंतील [ महाराष्ट्रांतील ] व खानदेशांतील मुलूक, मुंबई इलाख्यांतील इतर मुलुकांप्रमाणें, हल्लीं सन १८७९ चा आक्ट १ यांतील स्टांपाबाबदच्या सामान्य कायद्याच्या अमलाखालीं आहे. |
| १८३४ | १ | [ भाषांतर उपलब्ध नाहीं. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] | [ ३ रें कोष्टक पाहा. ] |

पहिलें परिशिष्ट—चालू.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. | शेरा. |
| | | **भाग २.—मुंबई शहर व टापू यांबाबदच्या कानू, आईन व कायदे.** | | |
| १८२९ | २ | सन १८१२ ची कानू, आईन व कायदा १, हीं अंशतः रद्द करणें. | सगळा. | अमल होऊन गेला. |
| १८२७ | १ | सन १८१४ ची कानू, आईन व कायदा १, हीं अंशतः रद्द करणें. | सगळा. | अमल होऊन गेला. |
| १८२८ | १ | धक्क्यांवरमाल राहूं देण्याची मनाई. | सगळा. | निरुपयोगी. |
| १८३४ | १ | सन १८२७ ची कानू, आईन व कायदा २, हीं अंशतः रद्द करणें. | रद्द झालेला नसेल तेवढा. | अमल होऊन गेला. |
| | | **भाग ३.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | | |
| १८३६ | ७ | कित्येक कायद्यांचा आधार. | रद्द झालेला नसेल तेवढा. | कलम २ हें सन १८६८च्या ८ व्या आक्टावरून रद्द केलेलें आहे. कलम २ हें, मीठ किंवा अफीण यांवर घ्यावयाच्या ड्यूटींची बाबत खेरीज करून, सन १८६८ च्या ८ व्या आक्टावरून रद्द केलेलें आहे. कित्येक कायद्यांअन्वयें चालविलेलीं कामें या कलमावरून कायदेशीर ठरविलीं आहेत. परंतु हे सर्व कायदे निरुपयोगी झालेले आहेत. सन १८१७ चे कायदे ३ व ४, सन १८१८ चा कायदा ७ आणि सन १८२१ चा ४ हे, सन १८२७ चा मुंबईचा कायदा १ यावरून रद्द झालेले आहेत; सन १८२७ चा कायदा १९ हा, सन १८७६ चा मुंबईचा आक्ट २ यावरून रद्द झालेला आहे; सन १८२८ चा कायदा १९ हा, सन १८९० च्या २४ व्या आक्टावरून रद्द झालेला आहे; सन १८३० |

## पहिलें परिशिष्ट—चालू.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. | शेरा. |
| **भाग ३.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट—चालू.** | | | | |
| १८३६ | ७—चालू. | कित्येक कायद्यांचा आधार. | | चा कायदा २० हा, सन १८७८ च्या १ ल्या आक्टावरून रद्द झालेला आहे; सन १८३१ चे कायदे २ व १३ हे, सन १८३८ च्या १ ल्या आक्टावरून रद्द झालेले आहेत; सन १८३३चा कायदा १ हा, सन १८९२च्या १ ल्या आक्टावरून रद्द झालेला आहे; सन १८३३ चा कायदा १० हा, सन १८९९ च्या १७ व्या आक्टावरून रद्द झालेला आहे; आणि सन १८२७चे कायदे २० व २१ हे बहुतेक सर्वांशीं रद्द झालेले असून, त्यांचा बाकी राहिलेला भाग प्रस्तुत मसुद्यावरून रद्द करण्याचें योजिलें आहे.<br>सदरहू कोणत्याही कायद्याअन्वयें चालविलेल्या कामाच्या कायदेशीरपणासंबंधीं कोणतेही प्रश्न उत्पन्न होऊं नये असा, मसुद्यांतील ३ऱ्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफावरून बंदोवस्त केला आहे.<br>आणखी, सन १८७८ च्या पहिल्या आक्टासमोरचा शेरा पुढें पाहा. |
| १८९२ | ११ | धारामाफीच्या इनामांवर धनीपणाचा हक्क. | कारणांतील, 'धनीपणाचे हक्काचा ठराव करण्याचे शिरस्त्यांप्रमाणें व मुंबई इलाख्याचे कायदे पुस्तकांतील सन १८२७ चे १७ वे कायद्याचे ९ वे व १० वे बाबेंत लिहिलेल्या शिरस्त्यांप्रमाणें व या बाबेचा पुरवण्याप्रमाणेंही त्याचा निकाल होऊं शकत नाहीं,' हे शब्द व अंक.<br>१ ल्या कलमापैकीं रद्द झालेला नसेल तेवढा अंश.<br>[ रद्द करावयाचा मजकूर भाषांतरांत नाहीं ]. | प्रश्न—या आक्टाचे हे अंश कायद्यांत राहूं देणें जरूर आहे किंवा कसें सन १८२७ चा मुंबईचा कायदा १७ याच्या बाबी ९ व १० आणि सन १८३३ चा मुंबईचा कायदा ६ हीं, सन १८६३ चा मुंबईचा आक्ट ७ यावरून रद्द केलेलीं आहेत.<br>सन १८९२ च्या ११व्या आक्टाच्या १ ल्या कलमाचा कांहीं भाग, सन १८७४ च्या १६ व्या आक्टावरून रद्द केलेला आहे.<br>[ ४ थे कोष्टक पाहा. ] |

पहिलें परिशिष्ट—चालू.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. | शेरा. |
| | | **भाग ३.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट—समाप्त.** | | |
| १८७४ | १९ | सन १८७४ चा कायद्यांचे स्थानिक व्याप्तीचा आक्ट. | कलम ८, रकम (ऐ). | सन १८६८ च्या ४ थ्या आक्टांत सांगितलेलीं गांवें स्वतंत्र देशी संस्थानिकांचीं होत—मुंबई सरकारचा तारेचा संदेश, तारीख २६ जुलै सन १८९३, हा पाहा. सबब सन १८७४ चा आक्ट १९ याच्या ८ व्या कलमांतील रकम (ऐ) ही दाखल करण्याची जरूरी नव्हती. |
| १८७९ | ६ | [भाषांतर झालें नाहीं]. | [३ रें कोष्टक पाहा]. | [३ रें कोष्टक पाहा]. |
| १८७६ | १० | सन १८७६ चा मुंबईच्या रेव्हिन्यू हुकुमतीचा आक्ट. | उद्देशांतील, 'व सन १८७१ चे जमिनीचे सुधारणुकेचे आक्टाचे तिसरे कलमांत सांगितलेले कारणांखेरीज इतर कारणांसाठीं दिलेल्या तगाई स्थानिक सरकारानें वसूल करण्याबाबद नियम ठरविणें,' हे शब्द व अंक. | हा मजकूर सन १८७६ च्या १० व्या आक्टाचें कलम १७, रकम तीन ही, सन १८८० चा आक्ट १९, कलम २, यावरून रद्द झाल्याकारणानें, निरुपयोगी झाला आहे. |
| १८७७ | १४ | [भाषांतर झालें नाहीं]. | [३ रें कोष्टक पाहा]. | [३ रें कोष्टक पाहा.] |
| १८७८ | १ | सन १८७८ चा अफिणीचा आक्ट. | २ ऱ्या कलमाचा ३ रा पॅरिग्राफ. | या पारिग्राफाचा सन १८३६ च्या ७ व्या आक्टाशीं संबंध असून, हा आक्ट रद्द करण्याचें योजिलें आहे—वर सदरहू आक्टासमोरील शेरा पाहा.<br>(हा पारिग्राफ कां दाखल केला होता याचें कारण स्पष्ट कळत नाहीं; या पारिग्राफाचा भावार्थ पाहिला असतां, सन १८७८ च्या १ ल्या आक्टाअन्वयें चालविलेलें काम सन १८३६ च्या आक्टावरून कायदेशीर ठरविल्याप्रमाणें होतें, तेव्हां तसें करण्याचें कारण काय असावें हें उघड होत नाहीं.) |
| १८८४ | ११ | [भाषांतर झालें नाहीं]. | [३ रें कोष्टक पाहा]. | [३ रें कोष्टक पाहा.] |

## दुसरें परिशिष्ट.

कायदे सुधारले ते.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साल. | नंबर. | विषय किंवा सरनामा. | सुधारणा. | शेरा. |
| | | | **भाग १.—मुंबई कोडांतील कायदा.** | |
| १८३० | १३ | [भाषांतर उपलब्ध नाहीं]. | [३ रें कोष्टक पाहा]. | [३ रें कोष्टक पाहा.] |
| | | | **भाग २.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा आक्ट.** | |
| १८३९ | २० | हक्क वगैरे घेणें. | कलम ३ यांत, 'तो माणूस वसुलाचा अमलदार असो किंवा नसो तथापि सन १८२७ चे सतरावे कायद्याचे सोळावे कलमांत लिहिलेला गुन्हा त्यास लागेल आणि त्या कलमांत लिहिलेले हुकुमावरून जर त्या माणसावर गुना साबीत होईल तर त्यास सात वर्षेंपर्यंत कैद मिळेल आणि घेतले पैक्याचे दसपट दंड पडेल,' या मजकुराच्या बदला, 'तो सरकारचा वसुलाचा अमलदार असो किंवा नसो, तो पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तसेंच याप्रमाणें घेतलेल्या रकमेच्या दसपटीहून जास्त नाहीं अशा दंडासही पात्र होईल' हा मजकूर वाचावा. | सन १८२७ चा मुंबईचा कायदा १७ हा सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ९ यावरून रद्द केला आहे. हा आक्ट बहुतेक सगळ्या मुंबई इलाख्यास लागू आहे—कलम १ व सन १८७४ चा शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट याखालील जाहिरनामे पाहा. सन १८३९ च्या २० व्या आक्टांत सन १८२७ चा मुंबईचा कायदा १७ यावर हवाला दिला आहे तो, सन १८७९ चा मुंबईचा आक्ट ९, कलम २, या अन्वयें, सन १८७९ च्या आक्टाच्या ४थ्या बाबीवर दिला असल्याप्रमाणें वाचला पाहिजे. परंतु मुलकी अमलदारांनीं अयोग्य रीतीनें पैका घेण्याबद्दल सदरहू बाबींत, दंड करणें, कमी दर्जावर उतरणें, सस्पिंड करणें व बडतर्फ करणें, या शिक्षा सांगितल्या असून (कलम ३२ पाहा), त्या सरकारी नोकर नसणाऱ्या मनुष्यांच्या बाबतींत योग्य नाहींत हें स्पष्ट आहे. सबब सन १८३९ च्या २० व्या आक्टाचें कलम ३ यांत दिलेल्या हवाल्याबद्दल, सन १८२७ चा मुंबईचा कायदा १०, कलम १६, रकम १ ली, हींत ठरविलेल्या शिक्षा (कैद व दंड) स्पष्टपणें सांगणें जरूर दिसतें, आणि याच उद्देशानें ४ थ्या कोष्टकांतील सुधारणा सुचविली आहे. |

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुत मसुद्याचा उद्देश, मुंबई कोडाच्या नव्या आवृतीचें पहिलें पुस्तक लवकरच प्रसिद्ध व्हावयाचें असल्याकारणानें, मुंबई इलाख्यास लागू असणाऱ्या कांहीं स्थानिक कायद्यांमधून निरुपयोगी मजकूर काढून टाकावा, व त्यांमध्यें दोन किरकोळ सुधारणा कराव्या, हा आहे.

सदरहू मसुदा मुंबई सरकारानें पसंत केला आहे.

तारीख ८ माहे जानेवारी, सन १८९४.

ए. इ. मिलर

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.